मूल्यवर्धन
शांतिलाल मुथ्था फाउंडेशन

विद्यार्थी उपक्रम पुस्तिका

इयत्ता : चौथी

नाव : .....

शाळेचे नाव : .....

इयत्ता : ..... तुकडी : .....

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण), पुणे

अनुक्रमणिका

अब्राहम लिंकन यांचे छंद	१
यशाचे रहस्य	३
आळशाचे स्वप्नरंजन	४
राजूचा दिवस	७
माझे दैनंदिन वेळापत्रक	८
ताणाचे व्यवस्थापन	९
माझे मत	१०
माझी घरची कामे आणि कर्तव्ये	११
बिनधास्त बंटी	१२
रस्ता ओलांडताना हे करावे (क्रमाने लिहा)	१३
प्रत्येकाने रस्ता ओलांडताना असे का करायचे, असे तुम्हांला वाटते?	१३
धोक्याच्या सूचना	१४
शाळेतील सुरक्षा	१५
सर्वात चांगला पर्याय कुठला?	१५
न्याय निवाडा करा!	१६
प्रामाणिकपणाचे बीज	१७
जुने मित्र	२०
टोळी	२३
आदर किंवा अनादर?	२५
स्त्रिया काय करू शकतात? पुरुष काय करू शकतात?	२६
नेपोलियन आणि पुलावरचा माणूस	२७
एक ऐतिहासिक विजय	२८
आपली होडी	३०
दृढ निश्चयाची एक सत्यकथा	३१
सर्वेक्षण	३३
हे असे का होते?	३४
तुम्हांला हे माहीत आहे का?	३४
कागदाचे पाकिट तयार करा	३६
स्वयंमूल्यमापन	३७
रिकाम्या वेळेत करायचे उपक्रम	३८
शिक्षक नोंदी	४२

निर्मिती व प्रकाशन :

संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण), पुणे

संस्थापक, शांतिलाल मुथ्था फाउंडेशन, पुणे

मुद्रक : रुना ग्राफिक्स, पुणे

© सर्व हक्क प्रकाशकांच्या स्वाधीन

प्रथमावृत्ती : जून २०१७

शिक्षकांसाठी टीप :

ही पुस्तिका प्राथमिक शाळेसाठी शिक्षक उपक्रम पुस्तिका इयत्ता चौथी या पुस्तिकेशी संबंधित आहे.

मूल्यवर्धन
शांतिलाल मुथ्था फाउंडेशन

विद्यार्थी उपक्रम पुस्तिका

इयत्ता : चौथी

नाव : ----------

शाळेचे नाव : ----------

इयत्ता : ---------- तुकडी : ----------

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण), पुणे

अब्राहम लिंकन यांचे छंद

सुमारे २०० वर्षांपूर्वी अब्राहम लिंकन नावाचे एक महान नेते होऊन गेले. ते अमेरिकेचे अध्यक्ष होते. लहानपणी आणि मोठे झाल्यावर सुद्धा लिंकन यांनी अनेक छंद जोपासले होते.

त्यांना प्राणी खूप आवडत. लहानपणी एकदा मित्रांसोबत ते बागेत गेले होते. नुकतेच वादळ होऊन गेले होते. बागेत त्यांना पक्ष्यांची दोन पिल्ले सापडली. लिंकन यांनी सगळ्या बागेत शोधाशोध करून पिल्लांची घरटी शोधून काढली. त्यांच्या मित्रांनी त्यांची चेष्टा केली. पण लिंकन एवढेच म्हणाले, ''त्या दोन पिलांना त्यांच्या आईकडे सोपवले नसते तर मला रात्री झोप आली नसती.'' जेव्हा त्यांचे मित्र निव्वळ गंमत म्हणून प्राण्यांना दुखापत करायचे, तेव्हा लिंकन त्यांना लगेच थांबवायचे.

मोठे झाल्यावर त्यांना एकदा एक भटका कुत्रा दिसला. त्यांच्या मुलांना तो खूप आवडला. मग त्या कुत्र्याचा मालक त्याला

परत घेऊन जाईपर्यंत लिंकन यांच्या मुलांनी त्याला सांभाळले. नंतर लिंकनना दुसरा कुत्रा मिळाला. त्यांनी त्याचे नाव ठेवले फिडो.

लिंकन यांना मांजरीसुद्धा आवडत. एकदा सर्व कुटुंब संध्याकाळी जेवत असताना ते मांजरीला खाऊ घालू लागले. त्यांची पत्नी त्यांच्यावर फारच रागावली. पण त्यांनी त्या मांजरीला खाऊ घालणे सुरूच ठेवले.

आपल्या मुलांकरिता त्यांनी दोन बकरे आणले. त्या बकऱ्यांना घरभर फिरायची मोकळीक होती.

लिंकन यांच्याकडे घोडेसुद्धा होते. एकदा पागेमध्ये आग लागली, तेव्हा घोड्यांना वाचविण्यासाठी लिंकन यांनी जवळजवळ आगीमध्ये उडीच मारली.

तरुणपणी लिंकनना कुस्ती आणि मैदानी खेळ प्रिय होते. असे म्हणतात की खेळांच्या आवडीमुळे लिंकन यांचा स्वभाव एकदम कणखर बनला. त्यामुळे विरोधकांना ते कधीच घाबरले नाहीत. अध्यक्ष असताना त्यांनी अनेक लोकांचा विरोध सहन करून अमेरिकेतील गुलामगिरीची पद्धत मोडीत काढली.

लिंकनना चांगले गाता येत नव्हते, पण त्यांना संगीत आवडत होते. संगीतामुळे त्यांना आनंद मिळायचा. एकदा त्यांच्या ओळखीच्या काही लोकांनी त्यांच्या आवडीचे एक गाणे त्यांच्यासाठी म्हटले. दहा वर्षानंतर लिंकन त्या लोकांना पुन्हा भेटले, तेव्हा त्यांनी तेच गाणे त्या लोकांना म्हणायला सांगितले. लिंकन ते गाणे कधीच विसरले नाहीत.

विनोद सांगणे हा लिंकन यांचा अजून एक छंद होता. त्यामुळे त्यांना लोकप्रियता तर मिळालीच. शिवाय तरुण वयात त्यांना वाटणाऱ्या बुजरेपणावरही त्यांनी मात केली. स्वतःच्या ताडमाड उंचीची आणि बेढब रुपाची लिंकन यांना आधी लाज वाटायची.

लिंकन यांच्या असंख्य छंदांमध्ये वाचन हा त्यांचा सगळ्यात आवडता छंद होता. त्यांना फार काळ शाळेमध्ये शिकता आले नाही. पण भरपूर पुस्तके वाचून ते स्वतः शिकले. वेगवेगळ्या विषयांवरची पुस्तके ते कोणाकडून मागून आणून वाचत. त्यांनी बहुतेक सगळे ज्ञान पुस्तके वाचून मिळविले. अध्यक्ष झाल्यानंतर लिंकनना प्रचंड वाचनाची खूप मदत झाली. त्यांच्या पुष्कळशा कल्पना त्यांनी कुठल्यातरी पुस्तकात वाचलेल्या असायच्या. जेव्हा जेव्हा त्यांच्यापुढे काही प्रश्न उभे राहिले, तेव्हा त्यांनी पुस्तकांमध्ये उत्तरे शोधली. ताणतणाव हलका करण्यासाठीसुद्धा ते पुस्तकांचाच आधार घेत.

माझे छंद :

मला जोपासायला आवडतील असे छंद :

यशाचे रहस्य

शेकडो वर्षांपूर्वी सॉक्रेटिस नावाचे एक खूप मोठे विचारवंत होऊन गेले. अतिशय ज्ञानी म्हणून त्यांची ख्याती होती. खूप लोक त्यांच्याकडे शहाणपणाचे चार शब्द ऐकायला नेहमी जात.

एकदा एक तरुण त्यांच्याकडे गेला आणि त्यांना म्हणाला, ''मला खूप यशस्वी व्हायचे आहे. त्यासाठी मी काय करावे ?''

सॉक्रेटिसने त्याला विचारले, ''यशाचे रहस्य शिकण्यासाठी तू तयार आहेस का ?''

तो तरुण म्हणाला. ''हो, मी यशस्वी होण्यासाठी काहीही शिकायला तयार आहे.''

सॉक्रेटिसने त्या तरुणाला एका नदीपाशी नेले. तिथे त्याला सांगितले, ''पाण्यामध्ये उतर आणि नदी पार करून जा.''



तरुण मुळीच घाबरला नाही. त्याला माहीत होते की नदी काही फारशी खोल नाही. त्याने पाण्यात पाऊल टाकले आणि तो आत्मविश्वासाने चालू लागला.

अचानक सॉक्रेटिसने पाण्यात उडी मारली, तरुणाचे खांदे धरले आणि त्याचे डोके पाण्यात बुडविले.

तरुणाला आश्चर्याचा धक्काच बसला. त्याने सॉक्रेटिसच्या पकडीतून सुटायचा खूप प्रयत्न केला. पण सॉक्रेटिस खूप शक्तिशाली होते. त्यांनी तो तरुण खूप घाबरून जाईपर्यंत त्याचे डोके पाण्याखाली दाबून धरले.

मग सॉक्रेटिसने त्यांची पकड हलकी केली. तरुणाने पाण्यातून बाहेर उडी मारली आणि तो जोरजोराने धापा टाकू लागला.

श्वास पूर्ववत झाल्यावर तरुण रागावून म्हणाला, ''तुम्ही असे का केले? तुम्ही तर मला मारूनच टाकले असते.''

सॉक्रेटिसने शांतपणे विचारले, ''तुझे डोके पाण्याखाली होते, तेव्हा तुला सगळ्यात काय हवेसे वाटले?''

''हवा'' तो तरुण म्हणाला. ''मग झाले तर.

''मग झाले तर. यशस्वी होण्याचे रहस्य तुला कळले आहे.'' सॉक्रेटिस म्हणाले, ''तुला पाण्याखाली असताना तीव्रतेने हवेची गरज होती. तितक्याच तीव्रतेने जेव्हा काही हवे असे तुला वाटेल, तेव्हा ते तुला मिळेल. यशाचे दुसरे कुठलेच रहस्य नाही.''

आळशाचे स्वप्नरंजन

खूपखूप वर्षांपूर्वी एक तरुण मेंढपाळ होता. तो होता आळशी. मात्र त्याला स्वप्नात रमायला फार आवडायचे. त्याच्या घरचे जेव्हा त्याला मेंढ्यांना चरायला न्यायला सांगायचे, तेव्हा तो कुरकुरायचा आणि म्हणायचा, ''मला हे काम मुळीच करायचे नाही!'' इतर मेंढपाळ मुलांबरोबर तो शेवटी जेव्हा कुरणात पोहोचायचा, तेव्हासुद्धा मेंढ्यांकडे मुळीच लक्ष द्यायचा नाही. त्याऐवजी तो एका मोठ्या झाडाखाली बसून डुलक्या घ्यायचा आणि पोहोचायचा स्वप्नांच्या जगात!

कधी त्याला स्वप्न पडायचे की तो खूप धनाढ्य व्यापारी झाला आहे. त्याच्याकडे टोलेजंग घर आणि एक सुंदर बगीचा आहे.

तर कधी त्याला स्वप्नात दिसायचे की तो खूप प्रसिद्ध योद्धा झालेला आहे आणि राज्यातली सगळी प्रजा त्याचे कौतुक करते आहे.

तर कधी तो स्वप्नात बघायचा की तो स्वतःच राजा झालेला आहे!

जेव्हा तो मित्रांना आपल्या स्वप्नांबद्दल सांगे, तेव्हा ते त्याला म्हणत, ''मूर्खा! तू बिनकामाचा आहेस. तुला काहीही करता येणार नाही.''

एके दिवशी मेंढपाळाने मित्रांना सांगितले, ''तुम्ही बघाच. मी खूप प्रसिद्ध व्यक्ती होणार.''

मित्र अर्थातच त्याला हसले. पण त्यांच्या नकळत तो मेंढपाळ बदलला होता. त्याने एक योजना आखली होती. ती तडीस न्यायला तो सज्ज झाला.

त्या रात्री त्याने आपल्या कपड्यांचे गाठोडे बांधले. कोणाला न सांगता सकाळी लवकर त्याने घर सोडले. तो जवळच्या शहराकडे चालू लागला.

रस्त्यात त्याला घोड्यावर बसून सामानाची पोती घेऊन जाणारा एक व्यापारी भेटला. व्यापाऱ्याने त्याला विचारले, ''मुला,

कुठे निघालास?''

मेंढपाळ म्हणाला, ''मी एका महान गुरूकडे शिकायला शहरात निघालो आहे. मी त्यांच्याकडून खूप ज्ञान आणि शहाणपण मिळवीन. मग जे शिकलो आहे त्याचा उपयोग करून स्वतःच प्रसिद्ध गुरु होईन.''

''हा खूप चांगला बेत आहे,'' व्यापारी म्हणाला. ''पण, तू माझ्याबरोबर का येत नाहीस? मी तुला माझ्या दुकानात काम देईन आणि चांगले पैसे देईन. तू श्रीमंत झाल्यावर मग त्या महान गुरूकडे शिकायला जा.''

मेंढपाळाने या सूचनेचा विचार केला. त्याला वाटले की ही कल्पना खूपच चांगली आहे. ''ठीक आहे,'' त्याने व्यापाऱ्याला सांगितले, ''मी येतो तुमच्या दुकानात काम करायला.''

अशा रीतीने मेंढपाळ व्यापाऱ्याकडे काम करू लागला. काही दिवसातच तिथल्या कामात तो इतका व्यस्त झाला, की महान गुरूकडे जाऊन अभ्यास करण्याचा बेत तो विसरला. उरलेले आयुष्य तो फक्त नोकरच राहिला.

आपली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आपण काय करावे?

राजूचा दिवस

खालील वेळापत्रकात राजू नावाचा मुलगा शाळेच्या दिवशी काय काय करतो हे दाखविलेले आहे. राजू ज्या रीतीने वेळेचा उपयोग करतो, त्याविषयी तुम्हांला काय वाटते ?

वेळ	राजू काय करतो
सकाळी ७.०० ते ७.३०	झोपेतून उठतो.
सकाळी ७.३० ते ८.३०	खास असे काही करत नाही.
सकाळी ८.३० ते ९.३०	अंघोळ करतो, प्रातर्विधी उरकतो, शाळेचा गणवेष घालतो आणि शाळेला जाण्यासाठी तयार होतो.
सकाळी ९.३० ते ९.४०	शाळेत जाण्यासाठी बसस्टॉपर्यंत चालत जातो.
सकाळी ९.४० ते ९.४५	बसची वाट बघतो.
सकाळी ९.४५	शाळेच्या बसमध्ये बसतो.
सकाळी १०.००	बस शाळेत पोहोचल्यानंतर बसमधून बाहेर पडतो.
सकाळी १०.०० ते १०.३०	सकाळच्या प्रार्थनेची घंटा वाजेपर्यंत मित्रांसोबत खेळतो.
सकाळी १०.३० ते संध्याकाळी ५.००	शाळेमध्ये सगळ्या तासिकांना हजर राहतो (मधल्या सुट्टीत खेळतो आणि जेवणाचा डबा खातो).
संध्याकाळी ५.००	शाळेच्या बसमध्ये बसतो.
संध्याकाळी ५.१५	शाळेच्या बसमधून उतरून घरी चालत जातो.
संध्याकाळी ५.३०	घरी पोहोचतो, दप्तर फेकतो, कपडे बदलतो आणि मित्रांसोबत खेळण्यासाठी पळतो.
संध्याकाळी ५.३० ते ७.३०	मित्रांसोबत खेळतो.
संध्याकाळी ७.३० ते ८.३०	टीव्ही बघतो.
रात्री ८.३० ते ९.००	संध्याकाळचे जेवण करतो.
रात्री ९.०० ते ९.३०	पुन्हा टीव्ही बघतो.
रात्री ९.३० ते १०.००	अभ्यास करण्याचा प्रयत्न करतो (मात्र त्याच्या आईने त्याला आठवण करून दिल्यानंतरच).
रात्री १०.०० ते १०.१५	झोपी जातो.

माझे दैनंदिन वेळापत्रक

दोन वेळापत्रके बनवा. पहिल्या वेळापत्रकात शाळेच्या दिवशी सध्या तुम्ही जे काही करता ते नोंदवा. तुम्ही प्रत्येक कामासाठी किती वेळ घालवता हे सुद्धा लिहा (आवश्यकता भासल्यास राजूचे वेळापत्रक बघा). तुमच्या वेळापत्रकावर तुमच्या जोडीदाराशी चर्चा करा. मग तुमचे नवीन वेळापत्रक तयार करा.

माझे सध्याचे वेळापत्रक	
वेळ	मी काय करतो? / करते?

माझे नवीन वेळापत्रक	
वेळ	मी काय करावे?

ताणाचे व्यवस्थापन

राणी ही तुमच्याच वयाची मुलगी आहे. ती तुमच्यासारखीच शाळेला जाते. शाळेत ती रोज वेळेवर पोहोचते. पण आज मात्र तिला खूपच अडचणी येत आहेत.

शाळेचे दप्तर भरताना तिच्या लक्षात येते की गणिताचे पुस्तक कुठे दिसत नाही. ती आसपास शोधते. पण तिला ते सापडत नाही.

पुस्तक शोधत असताना तिचा धक्का आईने टेबलावर ठेवलेल्या पाण्याच्या बाटलीला लागतो. बाटली उघडी होती. बाटलीतले सगळे पाणी तिच्या गणवेषावर पडते.

ती घड्याळाकडे बघते. तिच्या लक्षात येते की दोन मिनिटांत तिची शाळेची रिक्षा येऊन पोहोचेल.

आता राणीच्या जागी तुम्ही स्वतः आहात अशी कल्पना करा.

तुम्हांला या क्षणी काय वाटेल?

तुम्ही शाळेत वेळेवर पोहोचाल असे वाटते काय?

भावनांवर नियंत्रण ठेवून, योग्य ती कृती करण्यासाठी काय करायला हवे? या परिस्थितीत काय करायला हवे हे खाली लिहा.

१. .....

.....

२. .....

.....

३. .....

.....

४. .....

.....

माझे मत

खाली दिलेले प्रत्येक विधान वाचा आणि त्याबाबत विचार करा. मग तुमच्या निवडीप्रमाणे 'मान्य' किंवा 'अमान्य' अशा रकान्यात ✓ अशी खूण करा. जमल्यास, शेवटच्या रकान्यामध्ये तुमच्या निवडीमागची कारणेसुद्धा लिहा.

क्र.	विधाने	मान्य	अमान्य	माझी कारणे
१.	शाळांना सुट्ट्या नसाव्यात.			
२.	सगळीकडच्या शाळा सकाळी ७ वाजता सुरू व्हाव्यात.			
३.	दुपारच्या जेवणासाठी फक्त १५ मिनिटांची सुट्टी असावी.			
४.	खोडकर मुलांना शाळेमध्ये येण्याची परवानगी असू नये.			
५.	शाळेत मुले आणि मुली असल्यास, त्यांना वेगवेगळ्या वर्गात बसण्यास सांगण्यात यावे.			
६.	शाळेचा गणवेष नसावा. मुलांना त्यांच्या आवडीचे कपडे घालण्यास परवानगी द्यावी.			
७.	मुलांना मोबाईल फोन वापरण्याची कधीच परवानगी देऊ नये.			
८.	पालकांनी त्यांच्या मुलांबद्दल शिक्षकांकडे वारंवार चौकशी करावी.			

माझी घरची कामे आणि कर्तव्ये

तुमची घरची प्रमुख कामे/कर्तव्ये खालच्या तक्त्यामध्ये लिहा. पहिल्या ओळीत एक उदाहरण दिले आहे. त्याप्रमाणे 'मी हे केले पाहिजे...' या स्वरूपात तुमची कामे/कर्तव्ये लिहा. मग तुम्ही प्रत्येक काम किती चांगल्या प्रकारे पार पाडता यावर विचार करा आणि प्रत्येकाला ० ते ५ या प्रमाणात गुणांकन करा. (५ गुण म्हणजे 'उत्कृष्ट' अथवा 'खूप चांगले')

क्र.	माझे काम/कर्तव्य	माझे गुणांकन
१.	मी घरच्या प्रत्येकाचा आदर केला पाहिजे.	
२.		
३.		
४.		
५.		
६.		
७.		
८.		

बिनधास्त बंटी

बंटी एक बिनधास्त मुलगा आहे. त्याला ना काळजी ना ताण. तो जे आवडते ते वाटेल तेव्हा करतो. तो सकाळी केव्हाही उठतो आणि त्याच्या मनात आल्यावरच दात घासतो. कधी तो अंघोळ करतो, तर कधी अंघोळीला दांडी मारतो. जेव्हा तो अंघोळ करतो तेव्हा साबणाची वडी लालभडक असेल तरच ती वापरतो. जर साबण दुसऱ्या रंगाचा असेल तर तो वापरत नाही. तसेच त्याची पसंती गुलाबी टूथपेस्टला आहे. पण टूथपेस्टच्या रंगाविषयी तो फार आग्रही नाही.

त्याला गोड पदार्थ आवडतात. विशेषतः चॉकलेट्स फार आवडतात. जर त्याला शक्य असते तर सकाळचा नाश्ता, दुपारचे जेवण आणि रात्रीचे जेवण यात त्याने फक्त चॉकलेट्स खाल्ले असते. भाज्या म्हणजे त्याच्या शत्रू नंबर १. जेवणाच्या ताटात जर त्याला भाजी दिसली तर तो साप दिसल्यासारखा किंचाळतो. बंटीने भाज्या खाव्यात किंवा दूध प्यावे म्हणून त्याच्या आईला त्याला वेफर्स अथवा दुसरा एखादा तळलेला पदार्थ द्यावा लागतो. रंगीबेरंगी प्लॅस्टिकच्या पिशवीतील तळलेले, चटकदार पदार्थ बंटीला फार आवडतात. त्याच्या मते, हे पदार्थ बनविणारे लोक या जगातील सगळ्यात थोर लोक आहेत.

बंटीला खेळायला आवडते. पण त्याचे कारण त्यामुळे त्याला मित्रांबरोबर राहण्याची संधी मिळते, हे आहे. ते जेव्हा क्रिकेट खेळतात, तेव्हा बंटीला यष्टीरक्षक व्हायला आवडते. मित्र जर फुटबॉल खेळत असतील तर बंटी नेहमी गोलरक्षक असतो.

बंटी टीव्हीचा मात्र चाहता नाही. त्याच्या मते सगळे कार्टून्स कंटाळवाणे असतात. इतर कार्यक्रम तर त्याहून जास्त कंटाळवाणे असतात. म्हणून तो टीव्ही बघणे टाळतो. त्याऐवजी तो क्रिकेट अथवा फुटबॉल खेळेल, किंवा दोस्तांशी गप्पा मारेल. तो मित्रांमध्ये फार लोकप्रिय आहे. त्याच्या घरचे लोकसुद्धा त्याच्यावर खूप प्रेम करतात. पण त्यांना सारखे वाटते, बंटीने आपल्या काही सवयी बदलायला पाहिजेत.

बंटीच्या वाईट सवयी कोणत्या आहेत ?

त्याला काही चांगल्या सवयी आहेत काय ?

रस्ता ओलांडताना हे करावे (क्रमाने लिहा)

.....

.....

.....

.....

.....

.....

प्रत्येकाने रस्ता ओलांडताना असे का करायचे, असे तुम्हांला वाटते?

- ☑ तीव्र वळणावर रस्ता ओलांडणे टाळावे.
- ☑ रस्त्यावर रहदारी दिसत नसली तरी काळजीपूर्वक पाहावे.
- ☑ रस्ता ओलांडताना सरळ रेषेत चालावे.
- ☑ रस्ता ओलांडताना कुणाशीही बोलणे टाळावे.
- ☑ रस्ता धावत–पळत ओलांडणे टाळावे.

धोक्याच्या सूचना

खाली दिलेले प्रत्येक चित्र बघा. दाखविलेल्या प्रसंगात असणाऱ्या व्यक्तींना धोक्याच्या कोणत्या सूचना द्यायला हव्यात याचा विचार करा. चित्रातील फलकावर त्या सूचना लिहा.





शाळेतील सुरक्षा

तुमच्या शाळेमध्ये पाळायच्या सुरक्षा सूचना लिहा. एक सूचना उदाहरण म्हणून दिली आहे.

१. कुंपणावरून/भिंतीवरून उड्या मारू नका.

२. .....

३. .....

४. .....

सर्वात चांगला पर्याय कुठला?

ॲनी घरून शाळेत चालत निघाली. वाटेत अचानक जोरात पाऊस सुरू झाला. तिच्याकडे छत्री किंवा रेनकोट नव्हता. शाळा अजून बरीच लांब होती.

अशा प्रसंगी तिने काय करावे? खालीलपैकी कोणता पर्याय सर्वात जास्त चांगला आहे?

- तिने पळत शाळेत जावे.
- बाजूने जाणाऱ्या गाडीला हात दाखवून लिफ्ट मागावी.
- तिने एका झाडाखाली उभे राहावे आणि पाऊस थांबायची वाट बघावी.
- तिने धावत घरी परतावे.
- तिने शाळेकडे चालत राहावे.

न्याय निवाडा करा!

ज्या व्यक्तीवर गुन्हा केल्याचा आरोप आहे, तिने तो गुन्हा खरोखरच केला आहे का, हे न्यायाधीश ठरवितात. न्यायाधिशांनी आरोपीला दोषी ठरविले, तर मग ते त्याला शिक्षा सुनावतात.

या उपक्रमामध्ये, तुम्ही न्यायाधीश व्हायचे आहे.

खाली दिलेले प्रसंग वाचा आणि ठरवा :

- या प्रसंगांमध्ये सांगितलेल्या तीन व्यक्तींपैकी एकाने तरी गुन्हा केला आहे काय ?

त्यांनी गुन्हा केला आहे असे जर तुम्हांला वाटले तर तुम्हांला ठरवायचे आहे :

- गुन्हा कोणता आहे ?
- काय शिक्षा करायला हवी ?

जर तुम्हांला वाटले की एकापेक्षा जास्त व्यक्तींनी गुन्हा केला आहे, तर तुम्हांला ठरवायचे आहे :

- जास्त शिक्षा कुणाला मिळायला हवी ?

प्रसंग १:

एक माणूस एका हॉटेलमध्ये जातो. वेटरला तो चहा आणायला सांगतो. सुरेश नावाचा वेटर त्याला चहा आणून देतो. तो माणूस चहा पितो. पैसे देऊन हॉटेलमधून बाहेर पडतो. त्याचा किमती मोबाईल फोन टेबलवरच राहतो. सुरेश मोबाईल उचलतो. त्याच क्षणी तो माणूस हॉटेलमध्ये परत येतो. सुरेशच्या हातात मोबाईल बघतो आणि ओरडतो, ''चोर! चोर!''



प्रसंग २:

शिरीष हा एका श्रीमंत घरातला मुलगा आहे. तो आपल्या वडिलांना भारीतला मोबाईल फोन विकत घेण्यासाठी पैसे मागतो. तुझ्याकडे आधीच तीन फोन आहेत, असे म्हणून त्याचे वडील त्याला पैसे देत नाहीत. रागावलेला शिरीष मोबाईल फोनच्या दुकानात जातो. दुकानदाराला काही फोन दाखवायला सांगतो.

दुकानदार त्याला सुमारे अर्धा डझन फोन दाखवितो. शिरीष सगळे फोन बघतो आणि म्हणतो, ''मला पाहिजे तसा फोन यात नाही.'' पण दुकानदार जेव्हा दुसऱ्या गिऱ्हाईकाबरोबर बोलण्यात गुंग असतो, तेव्हा शिरीष एक फोन स्वतःच्या खिशात टाकतो आणि दुकानातून जायला निघतो. दुकानदार त्याला परत बोलावतो. शिरीष दुकानातून बाहेर पळतो. दुकानदार ओरडतो, ''चोर! चोर!''

प्रसंग ३:

रमेश एक गरीब माणूस आहे. पैसे मिळवून घर चालविण्यासाठी तो रेल्वे स्टेशनच्या बाहेर काम करतो. तो लोकांना सामान नेण्यासाठी मदत करतो आणि मग त्यांच्याकडून पैसे घेतो. काही लोक पैसे देतात, काही देत नाहीत. आज रमेशने एका मोठ्या कुटुंबाला त्यांचे सामान त्यांच्या गाडीपर्यंत नेण्यास मदत केली. सगळे सामान गाडीत ठेवल्यानंतर, रमेशने पैसे मागितले. त्या कुटुंबातील एका माणसाने आपले पैशाचे जाडजूड पाकीट काढले. ते पाकीट काढताना त्याचा मोबाईल फोन खिशातून खाली पडला. रमेशने ते बघितले, पण फोनच्या मालकाने ते पाहिले नाही. त्याने रमेशला दहा रुपये दिले. तो गाडीत बसला आणि त्याने गाडी चालू केली. रमेशने रस्त्यावर पडलेला फोन उचलला. गाडीत मागच्या बाजूला बसलेल्या बाईने रमेशला फोन उचलताना पाहिले. ती ओरडली, ''चोर! चोर!''

प्रामाणिकपणाचे बीज

अब्दुलशेठची मोठी आमराई होती. तो झाडांची खूप काळजी घेई. त्याचे आंबे अगदी उत्तम, रसाळ असत. दूरदूरवरून लोक त्याच्याकडे आंबे खरेदी करायला येत आणि चांगली किंमत देऊन आंबे विकत घेत. अब्दुलशेठ श्रीमंत झाला आणि त्याने एक मोठे घर बांधले. पण आता त्याचे वय झाले होते. त्याला जाणवले की मोठ्या झालेल्या आपल्या मुलांपैकी कुणाकडेतरी आमराईची जबाबदारी सोपविण्याची वेळ आलेली आहे. त्याला दोन मुले आणि एक मुलगी होती.

आपल्या मोठ्या मुलाला आमराईचा नवीन मालक करण्याऐवजी अब्दुलशेठने काहीतरी वेगळे करायचे ठरविले. त्याने आपल्या मुलांना बोलाविले आणि त्यांना सांगितले, ''आता माझ्या निवृत्तीची वेळ आली आहे. त्यामुळे आमराईचा ताबा कोणाकडे द्यायचा हे ठरवावे लागेल. मी तुम्हा सगळ्यांना एक काम देतो. त्यानंतर आमराईचा मालक बनण्यासाठी योग्य व्यक्ती कोण आहे ते मी ठरवेन.''

मुलांना धक्काच बसला. पण अब्दुलशेठ म्हणाला, ''मी तुमच्यापैकी प्रत्येकाला आंब्याची एकेक कोय देणार आहे. तुम्ही ती लावा, तिला पाणी द्या आणि वाढत्या रोपाची चांगली काळजी घ्या. एका वर्षानंतर मी तुमच्या रोपांची पाहणी करेन. ज्याचे रोप सर्वोत्तम असेल तो आमराईचा पुढचा मालक होईल.''

मोठा मुलगा रागाने म्हणाला, ''हा मूर्खपणा आहे.'' आपली बहीण रुखसानाकडे पाहून तो म्हणाला, ''तिचे रोप सर्वोत्तम ठरले तर काय? तिला आमराई कशी सांभाळता येणार? ती एक स्त्री आहे!''

अब्दुलशेठचा निर्णय मात्र ठाम होता. ''मी तुमची योग्यता तुमच्या रोपांवरूनच ठरवेन,'' तो ठामपणे म्हणाला.

मग त्याने आंब्याची एकेक कोय आपल्या तीनही मुलांना दिली. तिघेही कोय लावण्यासाठी घाईघाईने गेले.

रुखसाना आपल्या भावांसारखी नव्हती. तिच्या भावांना झाडांबद्दल काही प्रेम नव्हते. रुखसानाला मात्र आंब्याचे झाड कसे वाढवायचे याची पूर्ण माहिती होती. पण तिने लावलेल्या कोयीला अंकुर फुटलेच नाहीत. तिने कोय नीट लावली होती, खत घातले होते आणि नियमितपणे पाणी दिले होते. पण काही आठवड्यानंतरसुद्धा त्या कोयीला अंकुर फुटायचे कुठलेही चिन्ह नव्हते. उलट तिच्या दोन्ही भावांची आंब्याची रोपे मात्र एकदम तरारली होती.

ती फार काळजीत पडली. ती आपल्या भविष्याचा विचार करू लागली. तिच्या मनात आले, 'कोणत्याही भावाने हे आव्हान जिंकले, तरी शेवटी त्यांच्यात भांडण होणारच आहे, त्या दोघांनाही झाडांमध्ये रस नाही. ते आमराईची वाट लावतील किंवा कोणाला तरी विकून टाकतील. मग मी काय करू?'

रुखसानाने खूप विचार केला. ''एखादे निरोगी आंब्याचे रोप घेऊन तेच मला दिलेल्या कोयीतून उगवले असे सांगावे काय? की मी परीक्षेमध्ये नापास झाले आहे असे वडिलांना स्पष्ट सांगावे? का त्यांना आमराई एखाद्या चांगल्या शेतकऱ्याला विकावी असे पटवून देण्याचा प्रयत्न करावा? म्हणजे मग तिची निदान नासाडी तरी होणार नाही.''

या सगळ्या प्रश्नांचा तिने खूप विचार केला.

पण कुठलाही अप्रामाणिकपणा करण्याची तिची तयारी नव्हती. शिवाय वडिलांच्या निर्णयाविरुद्ध काही करण्याचीही तिला इच्छा नव्हती.

म्हणून तिने भविष्याला तोंड देण्याची मानसिक तयारी केली. तिचा कुठलातरी एक भाऊ ती आमराई मिळवेल. मग घरची आमराई एक तर विकली जाईल किंवा तिचा नाश होईल. मग तिला कुठल्यातरी दुसऱ्या आमराईमध्ये काम शोधावे लागेल. कारण आंब्याच्या झाडांची मशागत न करता जगणे तिला अशक्य होते.

एक वर्ष संपले. अब्दुलशेठनी मुलांना त्यांची रोपे दाखवायला सांगितली. दोघा मुलांच्या रोपांकडे बघून तो म्हणाला, ''व्वा, किती छान रोपे!'' रुखसानाकडे वळून तो म्हणाला, ''अगं मुली, तुझे रोप कुठे आहे?''



रुखसाना खजिल होऊन म्हणाली, ''बाबा, मी परीक्षेत नापास झाले आहे! माझ्याकडे रोप नाही! मी खूप काळजी घेतली, पण त्या कोयीला अंकुर फुटलाच नाही.''

अब्दुलशेठने तिला मिठीच मारली आणि तो म्हणाला, ''वा, छान, माझ्या लाडक्या मुली! मला तुझा अभिमान आहे! तूच या आमराईची नवीन मालक आहेस. ''

''हे कसे शक्य आहे?'' दोन्ही मुले रागावून म्हणाली.

अब्दुलशेठ शांतपणे म्हणाले, ''एक वर्षापूर्वी मी तुम्हां प्रत्येकाला एकेक कोय दिली होती. मी तुम्हांला सांगितले होते की कोय घ्या, लावा, तिला पाणी घाला. रोपाची चांगली काळजी घ्या. पण मी तुम्हांला उकळलेल्या कोयी दिल्या होत्या. त्या कोर्यींना अंकुर फुटणे अशक्यच होते. तुम्ही दोघांनी एकतर दुसरी कोय वापरली किंवा आंब्याची रोपे दुसरीकडून आणून येथे लावली. फक्त रुखसानाकडेच फसवणूक न करण्याचा प्रामाणिकपणा आणि धाडस होते. म्हणून तीच आता या आमराईची नवी मालकीण होईल.''

जुने मित्र

सायकलवरून शाळेकडे जाताना जतिनला दिसले की मिसेस इराणी त्यांच्या घराबाहेर थांबल्या होत्या. त्या थोड्या काळजीत दिसत होत्या, जतिन थांबला आणि त्याने विचारले, ''काय झाले मिसेस इराणी? तुम्ही एवढया काळजीत का दिसता?'' त्या हसल्या आणि म्हणाल्या, ''छे रे ! मी कुठे काळजी करतेय, मी तर माझ्या जुन्या आवडत्या मैत्रिणीची, मायाची वाट पाहते आहे. ती कोलकात्याहून मला भेटायला येणार आहे. ती रेल्वेने येते आहे आणि ती कोणत्याही क्षणी इथे येईल.''

ही माहिती ऐकून जतिन गोंधळला. मिसेस इराणी स्वभावाने कडक म्हणून प्रसिद्ध होत्या. (यापूर्वी एका शाळेच्या त्या मुख्याध्यापिका होत्या). त्याला कल्पनाच करता येईना की त्यांना जवळची मैत्रीण असू शकेल. पण याबाबतीत जास्त बोलण्यासाठी जतिनकडे वेळ नव्हता. त्याला शाळेला वेळेत

पोहोचणे आवश्यक होते. जतिन सायकलवर बसून निघाला, तेव्हा मिसेस इराणी म्हणाल्या, ''शाळेनंतर संध्याकाळी ये, मी तुला माझ्या मैत्रिणीची ओळख करुन देईन.''

शाळेत दिवसभर जतिन मिसेस इराणींच्या मैत्रिणीबद्दल विचार करीत राहिला. ही मैत्रीण मिसेस इराणींप्रमाणे गोरी आणि सडपातळ असेल का? ती पण कडक स्वभावाची आणि शिस्तबध्द असेल का? मिसेस इराणींप्रमाणे त्यांनाही मस्त मटन कटलेट करता येत असतील का?

या सर्व प्रश्नांची उत्तरे हवी असतील तर एकच मार्ग होता. शाळेनंतर जतिन सरळ मिसेस इराणींच्या घरी गेला. त्यांनी त्याचे मनापासून स्वागत केले. जतिनने त्यांची मैत्रीण मायाला पाहिले. त्याने जशी कल्पना केली होती तशी माया अजिबातच नव्हती. ती सावळी आणि थोडी लठ्ठ होती. तिच्या चेहऱ्यावर स्मितहास्य होते.

जतिनला विचारल्याशिवाय राहवले नाही. ''तुमची मैत्री कशी झाली?'' त्याने विचारले. मिसेस इराणी हसल्या आणि म्हणाल्या, ''ती मोठीच कथा आहे.'' मग कटलेट आणि चहा घेता घेता त्यांनी जतिनला ती गोष्ट सांगितली.

गोष्ट फार जुन्या काळातली होती जेव्हा शहनाझ (मिसेस इराणीचे प्रथम नाव) शाळेत इयत्ता पाचवीत होत्या. माया वर्गात नवीन होती. शहनाजला प्रथम माया आवडत नव्हती. माया फार सावळी आणि लठ्ठ होती म्हणून ती तिच्याशी बोलणे टाळत असे.

एक दिवस गणिताच्या शिक्षक़ांनी वर्गात परीक्षा घेतली. शहनाजची सर्वात जवळची मैत्रीण रीटाने शहनाजच्या वहीतल्या सर्व उत्तरांची नक्कल केली.

काही दिवसांनी शिक्षकांनी दोघींना वर्गात उभे राहायला सांगितले. ते म्हणाले, ''तुम्हां दोघींची उत्तरे अगदी सारखी आहेत, चुकादेखील तशाच आहेत. तुमच्यापैकी एकीने दुसरीची नक्कल केली आहे. मला सांगा तुमच्यापैकी कोणी नक्कल केली आहे.''

क्षणभरही मागे पुढे न पाहता रीटा म्हणाली, ''सर, शहनाजने माझ्या उत्तरांची नक्कल केली.''

शहनाजला एवढा धक्का बसला की, ती काहीच बोलू शकली नाही. शिक्षकांनी तिला शिक्षा करण्यासाठी आपली लांब छडी उचलली (त्या काळात शिक्षक असे करत असत). शहनाजच्या डोळ्यांत पाणी आले. शिक्षक छडी घेऊन तिच्याकडे चालत आले. ती मोठयाने हुंदके देऊ लागली. त्याच वेळी माया उभी राहिली आणि म्हणाली, ''सर, मी रीटाला शहनाजच्या वहीतून नक्कल करताना पाहिले आहे.''

शिक्षक थांबले आणि त्यांनी शहनाजला विचारलं, ''काय, हे खरं आहे का?''

शहनाजने होकारार्थी मान हलवली. मिसेस इराणी म्हणाल्या, ''त्या दिवशी माझ्या लक्षात आले, कोण माझी खरी मैत्रीण आहे आणि कोण नाही.''

''पण तुम्ही दोघी इतक्या वेगळ्या आहात'' जतिन म्हणाला.

''आम्ही वेगळ्या आहोत हे खरं.'' मिसेस इराणी म्हणाल्या, ''मला वाटतं म्हणूनच आम्ही इतक्या चांगल्या मैत्रिणी आहोत, तुला असं वाटत नाही का माया?'' असे म्हणून त्यांनी मायाकडे पाहिले. माया हसून म्हणाली, ''मला माहीत नाही. मी त्याबद्दल विचार केलेला नाही.''

''मी मायाकडून बरेच काही शिकले,'' मिसेस इराणींनी जतिनला सांगितले, ''मी फार उद्धट, गर्विष्ठ आणि मूर्ख होते. मी प्रत्येकावर रागावून ओरडत असे. मायाने मला सभ्यपणे वागायला शिकविले.''

माया हसली व म्हणाली, ''पण तशी तू अजूनही कडक मुख्याध्यापिका आहेस.''

''होय,'' मिसेस इराणी म्हणाल्या, ''पण मी कोणावर ओरडत वा किंचाळत नाही. मी माझे म्हणणे स्पष्टपणे मांडते. मी कधी असभ्यपणे वागत नाही.''

जतिनला वाटले, हे खरे आहे. मिसेस इराणी नेहमीच स्पष्टपणे आणि ठामपणे बोलतात. त्यामुळे प्रत्येकाला त्यांच्या मनात काय आहे ते स्पष्टपणे समजते. पण त्यांच्या जिभेवरचा ताबा कधीही सुटत नाही. त्या कधीही अपशब्द वापरत नाहीत.

''मी सुद्धा तुझ्याकडून बरेच शिकले,'' माया म्हणाली, ''माझा आत्मविश्वास कमी असायचा. तुझ्या सहवासात मी आत्मविश्वासाने वागायला शिकले.''

ह्या दोन जुन्या मैत्रिणींबद्दल बरेच काही जाणण्यासारखे होते. जतिनचे लक्ष भिंतीवरील घड्याळयाकडे गेले आणि त्याच्या लक्षात आले की तो अजून घरी न पोहोचल्यामुळे त्याची आई काळजी करायला लागली असेल. त्याने त्या जुन्या मैत्रिणींचा निरोप घेतला. घराकडे सायकलवरून जाताना तो विचार करायला लागला ...

टोळी

उन्हाळ्याची सुट्टी सुरु झाली होती. मुकेश आणि त्याच्या टोळीला समजत नव्हते की रिकामा वेळ कसा घालवावा. त्यांचे निश्चित काही ठरलेले नव्हते. काही वेळा मुकेशच्या आज्ञेवरुन ते रस्त्याने येरझाऱ्या घालत होते. लोकांची चेष्टा करुन मोठ्याने हसत होते. काही वेळेला ते मुलींची चेष्टा करुन त्यांना नावं ठेवीत होते.

काही वेळा मुकेश म्हणायचा, ''आपण फुटबॉल खेळूया.'' मग ते सर्व रस्त्यावरच फुटबॉल खेळायचे. रस्त्याने वेगाने जाणाऱ्या मोटारसायकलींना आणि मोठ्या गाड्यांना त्यांच्या रस्त्यावरच खेळण्यामुळे अडथळा होत असल्याने शेवटी मोठी माणसे त्यांना हाकलून द्यायची.

मग मुकेशने एका नवीन खेळाचा विचार केला. हा खेळ टेनिस चेंडूने खेळता येणार होता. हा खेळ खालीलप्रमाणे खेळला जात होता :

- सर्व मुले एका मोठ्या गोलात उभे राहात.
- मुकेश एखाद्या मुलाचे नाव मोठ्याने पुकारायचा आणि गोलाच्या आत चेंडू उंच फेकायचा.
- ज्या मुलाचे नाव पुकारले गेले त्याला पळत जाऊन चेंडू झेलावा लागे.
- मग त्या मुलाला आपल्या जागी परत जावे लागे. नंतर त्याने दुसऱ्या मुलाचे नाव पुकारून चेंडू फेकायचा.
- जर एखाद्या मुलाने चेंडू गोलाच्या बाहेर फेकला तर तो नियम भंग (फाऊल) समजला जात असे. जर त्याने असे तीन वेळा नियमभंग केले तर तो खेळातून बाद होत असे.
- जर नाव पुकारलेल्या मुलाला चेंडूचा झेल घेता आला नाही तर तो बाद होत असे.
- सर्व मुले बाद झाल्यानंतर जो शेवटी नाबाद राहील तो विजेता असे.

हा खेळ नेहमीच नि:पक्षपातीपणे खेळला जात नसला, तरी तो मुलांना आवडत असे. चेंडू फेकण्यापूर्वी कोणाला मुकेशचे नाव पुकारण्याची हिंमत नव्हती आणि जेव्हा अखेरचा मुलगा मुकेशबरोबर नाबाद शिल्लक राहात असे, तेव्हा मुकेश चेंडू अशा रीतीने फेकत असे की नेहमी मुकेशच विजेता होत असे.

एकदा छोट्या रोमूने चेंडू गोलाच्या बाहेर टाकला आणि चेंडू श्री. व सौ. शर्मा या वृद्ध जोडप्याच्या घराच्या खिडकीवर जाऊन आपटला. मोठा आवाज होउन खिडकीचे काचेचे तावदान फुटले.

''पळा !'' मुकेशने टोळीला आज्ञा केली अणि मुले पळून गेली.

त्या दिवशी संध्याकाळी, कामावरुन परत आल्यावर रोमूच्या आईने रोमूला विचारले, ''तुम्ही मुले मिसेस शर्मांच्या घराजवळ खेळत होता का ?''



चित्रकथेचे पुस्तक (कॉमिक) वाचणाऱ्या रोमूने डोके वर केले आणि निष्पाप चेहरा ठेवून म्हटले, ''नाही. का?''

''बिचाऱ्या मिसेस शर्मा'', त्याची आई म्हणाली, ''कोणीतरी त्यांच्या खिडकीवर चेंडू फेकला आणि खिडकीच्या काचेचे फुटून तुकडे झाले. त्या तेव्हा खिडकीपाशी बसून वर्तमानपत्र वाचत होत्या. काचेचा एक तुकडा त्यांच्या चेहऱ्यावर डोळ्याजवळ लागला आणि त्यांच्या डोळ्याखाली जखम झाली. त्यांना डॉक्टरांकडे नेले आहे. त्यांच्या डोळ्याला काही इजा झाली नसली म्हणजे मिळवले.''

रोमूला कसेसेच झाले. त्याला वाटले की आपल्या आईला जे काही झाले ते सर्व सांगावे. त्याला त्या क्षणी डॉक्टरांच्या दवाखान्यात जाऊन मिसेस शर्मा ठीक आहेत का ते पहावे असे मनापासून वाटले. पण कशामुळे तरी त्याने आपले तोंड बंद ठेवले. तो आपल्या चित्रकथा पुस्तकाकडे वळला पण त्याला चित्रांकडे किंवा अक्षरांकडे लक्ष देता येईना. त्याच्या डोळ्यांसमोर फक्त मिसेस शर्मांच्या रक्तबंबाळ डोळ्याचे चित्र दिसत होते.

आदर किंवा अनादर?

खालील प्रसंग वाचा आणि मुलांचे वागणे आदराचे आहे का अनादराचे आहे ते ठरवा. शेवटच्या स्तंभात ✓ (आदराचे वागणे दर्शविण्यासाठी) आणि ✕ (अनादराचे वागणे दर्शविण्यासाठी) अशा खुणा करा.

अ.क्र.	प्रसंग	आदर/ अनादर
१.	थॉमस शाळेत प्रवेश करीत आहे. त्याची वर्गशिक्षिका त्याच्यामागे चालत आहे. ती म्हणते, ''गुडमॉर्निंग थॉमस.'' तो त्यांचे बोलणे ऐकू आले नाही असे दाखवितो.	
२.	श्वेता आणि निखिला बसमधे बसलेल्या आहेत. एक वृध्द गृहस्थ बसमध्ये प्रवेश करतात. त्या दोघी उभ्या राहून त्यांना बसायला जागा देतात.	
३.	रमेशकडे पेन नाही. तो जोडीदाराचे पेन उचलतो आणि लिहायला सुरुवात करतो.	
४.	रोमिला लठ्ठ आहे. वर्गातली मुले तिला 'जाडी' म्हणतात.	
५.	नीला आपल्या मित्रमैत्रिणींबरोबर बसली आहे. रविवारी सकाळी काय करावे, यावर मुली चर्चा करीत आहेत. नीता इतरांच्या विचारांशी सहमत नाही. त्यांचे बोलणे सुरू असताना ती गाणे गुणगुणायला सुरुवात करते.	
६.	मयूरची बहीण गणितातील उदाहरणे सोडविण्याचा प्रयत्न करत आहे. ती मयूरला विचारते, ''ही उदाहरणे सोडविण्यासाठी मला कृपया मदत करशील का?''	
७.	मयूर आपल्या बहिणीला गणितातील उदाहरणे सोडविण्यास मदत करतो. तो तिला प्रत्येक पायरी समजावून सांगतो. पण तरीही तिला कळत नाही. तो तिला म्हणतो, ''तुला कधीही गणित जमणार नाही.''	
८.	काही तरुण मुले रस्त्यावर उभी आहेत. एक पांगळा माणूस रस्ता ओलांडताना ते पाहतात. ते ओरडून म्हणतात, ''ए लंगड्या वेगाने चाल. नाहीतर वाहनाला धडकून पडशील!''	
९.	आपल्या समुदायाच्या प्रथेप्रमाणे सानिया डोक्यावर रुमाल बांधते. तिचे काही वर्गमित्र सारखा तिचा रुमाल ओढतात.	
१०.	एक छोटा मुलगा आपल्या मोठ्या बहिणीला शाळेत जे काही घडले ते सर्व सांगत आहे. ती घाईत आहे पण तरीही ती त्याचे शांतपणे ऐकून घेते.	

स्त्रिया काय करू शकतात? पुरुष काय करू शकतात?

खाली दिलेली यादी वाचा आणि जे काम फक्त (१) स्त्रिया करू शकतात (२) फक्त पुरुष करू शकतात किंवा (३) स्त्री–पुरुष दोघेही करू शकतात, त्यापुढे ✓ अशी खूण करा. एका ओळीत फक्त एकदाच ✓ खूण करायची आहे.

अ.क्र.	काम	फक्त स्त्रिया करू शकतात	फक्त पुरुष करू शकतात	स्त्री अणि पुरुष दोघेही करू शकतात
१.	स्वयंपाक			
२.	कार चालविणे			
३.	कपडे धुणे			
४.	मुलांची काळजी घेणे			
५.	मोटरसायकल चालविणे			
६.	पोलीस अधिकारी म्हणून काम करणे			
७.	देशाचा पंतप्रधान म्हणून काम करणे			
८.	कपडे शिवणे			
९.	कॉम्प्युटर वापरणे			
१०.	कारखान्याचे व्यवस्थापन करणे			
११.	घरातला बल्ब बदलणे			
१२.	भाज्या चिरणे			
१३.	परिचारिका (नर्स) म्हणून काम करणे			
१४.	बस वाहक (कंडक्टर) म्हणून काम करणे			
१५.	विमान चालक (पायलट) म्हणून काम करणे			
१६.	खानावळीत वाढपी (वेटर) म्हणून काम करणे			
१७.	लहान बाळाला अंघोळ घालणे			
१८.	घर झाडणे			
१९.	खेडयात सरपंच म्हणून काम करणे			
२०.	विहिरीतून पिण्याचे पाणी आणणे			
२१.	बांगड्या विकणे			
२२.	सायकल दुरुस्त करणे			
२३.	शाळेत शिक्षिका म्हणून काम करणे			
२४.	होडी वल्हवणे			

नेपोलियन आणि पुलावरचा माणूस

फ्रान्स नावाच्या देशाचा सम्राट नेपोलियन यांच्याबद्दल सांगितली जाणारी ही गोष्ट आहे. एकदा तो आपल्या सरसेनापतीसह फिरत होता. ते एका अरुंद पुलाजवळ आले. तो पूल इतका अरुंद होता की त्यावरून एका वेळी एकच व्यक्ती जाऊ शकत होती. नेपोलियन तो पूल ओलांडण्याच्या बेतात होता, त्याचवेळी त्याने पुलाच्या दुसऱ्या टोकाकडून एका माणसाला येताना पाहिले. तो माणूस आपल्या पाठीवर जड ओझे वाहून नेत होता. नेपोलियन तो माणूस पूल ओलांडून येईपर्यंत थांबला. त्याच्या सरसेनापतींनी ओरडून त्या माणसाला सम्राटांना वाट देण्याची आज्ञा केली. परंतु नेपोलियन आपल्या सरसेनापतीवर रागावला आणि म्हणाला, ''हा माणूस महत्त्वाचे काम करतो आहे. मी सम्राट असेन पण आता मी कोणतेही महत्त्वाचे काम करीत नाही. या क्षणी या माणसाचा वेळ माझ्या वेळापेक्षा अधिक मौल्यवान आहे. मी वाट पहात थांबू शकतो, तो नाही.''

एक ऐतिहासिक विजय

भारतीय क्रीडाक्षेत्राच्या इतिहासात २५ जून १९८३ हा एक फार मोठा दिवस होता. तो असा दिवस होता, जेव्हा एक दिवसीय क्रिकेटमध्ये, प्रथमच भारताने विश्वचषक जिंकला. हे यश खूपच लक्षणीय होते. मालिकेच्या सुरुवातीला भारत जिंकेल अशी कोणीच अपेक्षा केली नव्हती. त्या काळात भारतीय संघ एक दिवसीय क्रिकेटसाठी फार प्रभावी मानला जात नव्हता. भारतीय संघाने आधीच्या कोणत्याही एक दिवसीय क्रिकेट मालिकेत चांगले प्रदर्शन केले नव्हते.

इ. स. १९८३ च्या स्पर्धेत, अंतिम फेरीत पोहोचण्यासाठी भारताला वेस्ट इंडिज आणि ऑस्ट्रेलिया सारख्या बलवान संघांशी सामना करावा लागणार होता. वेस्ट इंडिजने यापूर्वी दोन वेळा विश्वकरंडक जिंकलेला होता आणि ह्यावेळी ते जिंकतील अशी अपेक्षा होती. परंतु स्पर्धेच्या पहिल्या सामन्यात भारताने वेस्ट इंडिजवर मात केली. प्रथम बॅटिंग करुन भारताने २६२ धावा केल्या. यशपालने सर्वात जास्त ८९ धावा केल्या. वेस्ट इंडिज बॅटिंग करायला आले तेंव्हा रॉजर बिनी आणि रवी शास्त्री यांनी

प्रत्येकी ३ बळी घेतले ; आणि वेस्ट इंडिज संघ २२८ धावांवर सर्व बाद झाला.

परंतु या विजयानंतर, मालिकेतील त्यानंतरच्या काही सामन्यांमध्ये भारताचा पराभव झाला. भारतीय संघाची अंतिम फेरीपर्यंत पोहोचण्याची शक्यता अंधुक झाली. भारतीय संघाने झिंबाब्वे आणि ऑस्ट्रेलिया या दोन्ही संघांना हरविणे आवश्यक होते.

झिंबाब्वे संघ कमकुवत म्हणून प्रसिद्ध होता, पण प्रथम बॅटिंग करुन भारताची सुरुवात वाईट झाली होती. पाच विकेटस् गमावून भारताच्या फक्त १७ धावा झाल्या होत्या. त्यानंतर भारतीय कर्णधार कपिल देव एक श्रेष्ठ इनिंग खेळला. त्याने १३८ चेंडूंमध्ये नाबाद १७५ धावा केल्या. त्याने त्यात १६ चौकार व ६ षट्कार फटकावले. भारताची धावसंख्या एकूण २६६ वर पोहोचली. जेव्हा झिबाब्वे संघ फलंदाजीसाठी आला, तेव्हा मदनलालने ३ गडी बाद करून भारताला ३१ धावांनी जिंकण्यास मदत केली.

या विजयानंतर आणि ऑस्ट्रेलिया विरुद्ध विजय मिळवून भारत उपांत्य फेरीपर्यंत पोहोचला. हा सामना इंग्लंड विरुद्ध होता. कपिल देव, मोहिंदर अमरनाथ आणि रॉजर बिनी यांनी इंग्लिश फलंदजांना धावसंख्या वाढवू दिली नाही. इंग्लंडच्या फक्त २१३ धावा होऊ शकल्या. जेव्हा भारत फलंदाजीसाठी आला तेव्हा यशपाल शर्मा आणि संदीप पाटील यांनी अर्धशतके केली. मोहिंदर अमरनाथने ४६ धावा केल्या. भारताने ६ विकेटने सामना जिंकला.

या विजयाने भारत अंतिम फेरीत पोहोचला. त्यांना जगातील सर्वोत्कृष्ट वेगवान गोलंदाज असलेल्या वेस्ट इंडिज संघाविरुद्ध हा सामना खेळायचा होता. केवळ कृष्णम्माचारी श्रीकांत (३८ धावा), संदीप पाटील (२७ धावा) आणि मोहिंदर अमरनाथ (२६ धावा) हेच फलंदाज वेस्ट इंडिज गोलंदाजांविरुद्ध धावा करू शकले. आपल्या इनिंगच्या शेवटी भारताची एकूण धावसंख्या १८३ होती. विव रिचर्डस् आणि क्लाइव्ह लॉइड सारख्या श्रेष्ठ फलंदाजांमुळे वेस्ट इंडिज ही एकूण धावसंख्या सहज ओलांडेल अशी अपेक्षा होती. तरीही कपिलदेवच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने जिद्द सोडली नाही. वेस्ट इंडिजचे आघाडीचे (ओपनिंग) फलंदाज संघाची धावसंख्या ५० पर्यंत पोहोचायच्या आत बाद झाले. त्यानंतर विव रिचर्डसने भारतीय गोलांदाजीला मैदानात चौफेर झोडपून काढले. मात्र रिचर्डस्चा एक फटका हवेत उंच गेला आणि कपिल देवने मोठे अंतर (अंदाजे २० मिटर) धावत जाऊन झेल घेतला. रिचर्डस् बाद झाला. मदनलाल आणि मोहिंदर अमरनाथ यांनी अगदी थोड्या धावा देऊन प्रत्येकी ३ बळी घेतले. कपिल देव, बी.एस.संधू व रॉजर बिनी यांनीही बळी घेतले. कपिल देव आणि सुनील गावसकर यांनी प्रत्यकी दोन झेल घेतले. वेस्ट इंडिज संघ १४० वर सर्व बाद असा पराभूत झाला आणि भारताने विश्वचषक जिंकला !

आपली होडी

रंगीत कागदाचे तुकडे कापून कागदावर चिकटवून खाली दाखविल्याप्रमाणे होडी तयार करा.

(१) होडीचा मुख्य भाग (२) शिडे (३) डोलकाठी (४) झेंडे यांच्यासाठी वेगवेगळे रंग वापरा.



दृढ निश्चयाची एक सत्यकथा

तामिळनाडूच्या सेलम जिल्ह्यातील एका खेड्यात मरिअप्पन थंगावेलुचा जन्म झाला. त्याचे कुटुंब गरीब होते आणि त्याची आई एकटीच कमविणारी होती. ती फळे विकायची. जेव्हा मरिअप्पन पाच वर्षांचा होता, तेव्हा त्याला अपघात झाला. तो खेळत होता तेव्हा एका बसने त्याला धडक दिली आणि त्याचा गुडघा चिरडला गेला. त्याच्या आईने त्याच्यावर उत्तम वैद्यकीय उपचार होण्यासाठी खूप प्रयत्न केले. परंतु डॉक्टरांना फार काही करता आले नाही. मरीअप्पनला आपला उजवा पाय गमवावा लागला.

मरीअप्पनच्या आईने त्याला उत्तम जीवन मिळावे, म्हणून त्याला शिक्षण द्यायचा निश्चय केला. अभ्यास करुन चांगली नोकरी मिळावी यासाठी तिने त्याला शाळेत पाठविले. शाळेतील काही मुले त्याची चेष्टा करीत असत. परंतु शिक्षक चांगले होते. त्यांनी त्याच्याकडे विशेष लक्ष दिले. काहीवेळा त्यांनी त्याची शाळेची फी देखील भरली. शारीरिक शिक्षणाच्या शिक्षकांनी इतर मुलांप्रमाणे त्यालाही खेळात प्रगती करण्यासाठी प्रोत्साहन दिले. शाळेने त्याला जिल्हा व राज्य स्तरावरील शारीरिक दिव्यांगत्व असलेल्या मुलांसाठी आयोजित क्रीडास्पर्धांमध्ये भाग घेण्यासाठी पाठविले. मरिअप्पनने या स्पर्धामधून इतरांपेक्षा जास्त पदके जिंकून उत्तम कामगिरी केली.

मिळाळेल्या या यशामुळे त्याला सेलममधील कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला. दिव्यांगत्व असलेल्या लोकांसाठी आयोजित क्रीडा स्पर्धांमध्ये भाग घेणे त्याने चालू ठेवले. उंच उडी ही त्याची सर्वात आवडती स्पर्धा होती. सेलममध्ये २०१३ साली आयोजित केलेल्या राष्ट्रीय चॅंपियनशिप स्पर्धेमध्ये, बंगलुरु येथे राहणाऱ्या सत्यनारायण या एका क्रीडा प्रशिक्षकाने त्याची उंच उडी पाहिली. सत्यनारायणने प्रत्यक्ष पाहिले की त्यांच्या हाताखाली प्रशिक्षण घेणाऱ्या, दिव्यांग नसलेल्या विद्यार्थ्यांपेक्षा मरिअप्पन उत्तम प्रकारे उंच उडी मारु शकतो.

सत्यनारायण त्याच्याजवळ गेले आणि त्यांनी विचारले, ''तू बंगलुरुला रहायला येऊन माझ्या हाताखाली प्रशिक्षण घेशील का? मी तुला असे उत्तम प्रशिक्षण देईन की एका वर्षात तुला आंतरराष्ट्रीय स्तरावर सुवर्णपदक जिंकता येईल.''

मरिअप्पन बंगलुरुला जाण्यासाठी उत्सुक होता, पण त्याच्या आईला मरिअप्पनच्या अभ्यासावर वाईट परिणाम होईल अशी काळजी वाटली. म्हणून मरिअप्पनचे कुटुंब आणि प्रशिक्षक यांनी दुसऱ्या पर्यायाचा विचार केला. मरिअप्पनने सेलममध्ये आपला अभ्यास चालू ठेवायचा आणि प्रत्येक शनिवार, रविवार आणि मोठ्या सुट्ट्यांमध्ये बंगलुरुला सत्यनारायण यांच्याकडे प्रशिक्षणासाठी जायचे.

सत्यनारायणने देणग्या मिळविल्या. त्यामुळे मरिअप्पनला बंगलुरुमध्ये उत्तम सुविधा मिळून उंच उडीचा सराव करता आला.

जेव्हा जेव्हा कॉलेजला सुट्टी असे, तेव्हा मरिअप्पन रेल्वेने सेलमकडून बंगलुरुकडे जात असे. रात्री तो सत्यनारायण यांच्या घरी राहात असे आणि दिवसा उंच उडीचा सराव करुन त्यात सुधारणा करीत असे. दोन वर्षाच्या कठोर प्रयत्नांनंतर मरिअप्पनची २०१६ च्या पॅरालिंपिक्समध्ये (शारीरिक दिव्यांगत्व असलेल्या खेळांडूच्या जागतिक ऑलिंपिक्स स्पर्धा) निवड झाली. ही स्पर्धा रियो डी जनेरो या दक्षिण अमेरिकेतल्या मोठ्या शहरात आयोजित केली होती.

इ. स. २०१६ च्या पॅरालिंपिक्समध्ये भारताकडून, मरिअप्पन थंगवेलू, वरुण भाटी आणि शरद कुमार सह एकूण १२ खेळाडू उंच उडीच्या स्पर्धेसाठी होते. प्रत्येक खेळाडूला बारच्या वरून, बार न पाडता उडी मारायची होती. प्रत्येक फेरीनंतर बार अधिक उंचीवर ठेवला गेला. ज्यांनी बार पाडला ते स्पर्धेतून बाद ठरले. केवळ तीन खेळाडू अंतिम फेरीत आले.

मरियप्पन आणि वरुण सर्वोत्कृष्ट तीनपैकी होते. दोघेही निदान रौप्य किंवा कांस्य पदक निश्चितच मिळविणार अशी खात्री होती. दोघांनी १.८३ मीटर (६ फूट) उंच उडी मारली. तथापि तिसऱ्या, अमेरिकेच्या, खेळाडूने १.८६ मीटर उंच उडी मारली. मरिअप्पन आणि वरुण यांनी आतापर्यंत एवढी उंच उडी पार केली नव्हती. तरीही त्यांनी सुवर्णपदक मिळविण्याचे ध्येय ठेवले. मग वरुणने १.८६ मीटर उंच उडी मारली आणि मरियप्पनने अजून चांगली कामगिरी करत १.८९ मीटरची उंच उडी मारली आणि भारताकरिता सुवर्णपदक जिंकले.

ह्या विलक्षण यशानंतर मरिअप्पनने आपलं सुवर्णपदक आपल्या आईला समर्पित केले.

सर्वेक्षण

तुमच्या आसपासच्या क्षेत्राच्या सर्वेक्षणासाठी हा फॉर्म वापरा.

आम्ही .....

शाळेचे विद्यार्थी आहोत. आपल्या आसपासच्या भागातील लोकांना, ज्या समस्यांना तोंड द्यावे लागते, त्या समस्यांचे सर्वेक्षण करणार आहोत, खालील प्रश्नांना उत्तरे देऊन कृपया आम्हांला मदत करावी.

१. आपण या भागात किती वर्षे राहात आहात?					
२. तुमच्या भागातील खालील घटकांविषयी तुमचे काय मत आहे? (प्रत्येक ओळीतील एकाच स्तंभात ✓खूण करावी.)	**उत्कृष्ट**	**चांगले**	**बरे**	**सामान्य**	**माहीत नाही**
शाळा					
रुग्णालये/डॉक्टर					
रस्ते					
पाणी पुरवठा					
सांडपाणी व्यवस्था					
वीज पुरवठा					
कचरा संकलन					
बस सेवा					

३. तुमच्या मते या भागातील लोकांना इतर कोणत्या मुख्य समस्यांना (असल्यास) रोज तोंड द्यावे लागते?

.....

.....

.....

.....

आपला वेळ व सहकार्य दिल्याबद्दल धन्यवाद!

हे असे का होते?

आंध्र प्रदेशातील पुट्टापारथी या नगरातील एक सामाजिक संस्था भटक्या गाईगुरांची काळजी घेते. २०१० साली जवळच्या अनंतपूर नगराकडून इथे ३६ गायी पाठवण्यात आल्या. त्यांच्या संस्थेत आल्यानंतर लवकरच एक गाय मरण पावली. गायीच्या मृत्यूचे कारण शोधून काढण्यासाठी एका पशुवैद्याला बोलावण्यात आले. पशुवैद्याने त्या मृत गायीचे शरीर विच्छेदन केले तेव्हा असे आढळले की गाईचे पोट प्लॅस्टिक पिशव्यांनी पूर्ण भरलेले आहे.

त्या प्राण्याच्या मृत्यूचे काय कारण होते असे तुम्हांला वाटते? यासाठी कोण जबाबदार होते?

तुम्हांला हे माहीत आहे का?

जेव्हा कचरा आणि टाकाऊ सामान कचरा कुंडीत टाकले जाते तेव्हा वस्तूंचे रूप बदलते आणि त्यांचे बारीक कणांमधे रुपांतर होते. हे कण मातीशी एकरूप होतात. या प्रक्रियेला विघटन असे म्हणतात. ही प्रक्रिया पाणी, हवा, उष्णता आणि जिवाणू (बॅक्टेरिया) ह्यांच्या प्रभावामुळे होते.

वेगवेगळ्या पदार्थांच्या विघटनासाठी लागणाऱ्या कालावधीमध्ये प्रचंड फरक आहे.

सर्वसाधारणपणे अन्नपदार्थांचे विघटन होण्यास कमीत कमी वेळ लागतो. टाकाऊ अन्नपदार्थ जर लाल गांडूळ असलेल्या एखाद्या डब्यात किंवा खड्डयात व्यवस्थित ठेवले तर २ ते ३ आठवडयात विघटित होतात. पण कचऱ्याच्या ढिगात टाकलेली संत्र्यांची साल विघटित होण्यासाठी ६ महिने लागतात.

कागद २ ते ६ आठवड्यात विघटित होतो तर पुठ्ठयाला विघटित होण्यास २ महिने लागतात.

सुती कापडाचे लहान तुकडे ३ महिन्यात विघटित होतात, पण लोकरीच्या कापडाला विघटित होण्यासाठी १ ते ५ वर्षे लागतात.

धातू, रबर, प्लॅस्टिक पासून बनविलेल्या वस्तूंना विघटीत होण्यासाठी खूपच अधिक काळ लागतो.

आपल्या रोजच्या वापरातल्या प्लॅस्टिक पिशव्या, सूर्यप्रकाश आणि हवा यांच्या प्रक्रियेमुळे १० ते २० वर्षांत विघटित होऊ शकतात. परंतु कचऱ्याच्या ढिगाऱ्यात फेकलेल्या प्लॅस्टिक पिशव्यांना सूर्यप्रकाश व हवा न मिळाल्यामुळे त्यांना विघटित होण्यासाठी १००० वर्षे लागू शकतात.

विघटनास लागणारा कालावधी

काचेच्या बाटल्या ..... एक दशलक्ष वर्षे

प्लॅस्टिक बाटल्या ..... ४५० वर्षे

ॲल्युमिनिअम कॅन ..... ८०–२०० वर्षे

चामडी बूट ..... ५० वर्षे

नायलॉनचे कापड ..... ३०–४० वर्षे

सिगारेटची थोटके ..... १–५ वर्षे

संत्र्यांच्या साली ..... २–५ आठवडे

कागद ..... २–४ आठवडे

आजकाल विवाहसमारंभात वगैरे जेवणासाठी ज्या स्टायरोफोम ताटांचा उपयोग केला जातो, त्याचे विघटन होण्यासाठी लाखो वर्षांपेक्षा अधिक काळ लागू शकतो. काचेचे विघटन होण्यासाठी देखील लाखो वर्षे लागतात, पण काच वितळवून त्याचा पुनर्वापर करता येतो.

कागदाचे पाकिट तयार करा

कोणत्याही टाकाऊ कागदाच्या तुकड्यापासून खाली दाखविलेल्या टप्प्यांप्रमाणे कागदी पाकीट तयार करा. हे पाकिट तोंड उघडे असलेल्या छोट्या पिशवीप्रमाणे तयार होईल. पाकिट दणकट बनवण्यासाठी जाड कागद वापरावा किंवा एकाच आकाराचे कागदाचे अनेक एकत्र चिकटविलेले तुकडे वापरावेत.



कागदाचा तुकडा



काटेकोर अर्धी घडी नको, कारण आपल्याला थोडी कडा पाहिजे आहे त्यामुळे समोरची घडी थोडी कमी लांबीची हवी



समोरच्या बाजूला चिकटवून टाका



आता कागदाचे एक नळकांडे तयार होईल.



नळकांड्याची दोन्ही टोके आतल्या बाजूस दुमडून घ्या



तुम्हांला असा आकार मिळेल.



त्रिकोण मध्याकडे दुमडून घ्या.



त्यांना डिंकाने चिकटवा.

स्वयंमूल्यमापन

खाली दिलेली विधाने वाचा आणि योग्य त्या विधानापुढे ✓ अशी खूण करा. एका ओळीत एकच खूण करायची आहे.

क्र.	विधाने	नेहमीच	बऱ्याच वेळा	केव्हातरी	कधीच नाही	सांगता येत नाही
१.	मी माझी मते, विचार स्पष्टपणे मांडतो.					
२.	जेव्हा मला राग येतो तेव्हा मी काय बोलतो व करतो त्यावर नियंत्रण करण्याचा प्रयत्न करतो.					
३.	जेव्हा मी संकटात असतो, तेव्हा मी शांत राहण्याचा प्रयत्न करतो.					
४.	जेव्हा मी चित्र काढतो, तेव्हा मी माझ्या स्वत:च्या कल्पना वापरतो.					
५.	मी माझे काम व्यवस्थिपणे व वेळेवर पूर्ण करतो.					
६.	मी माझ्या सर्व वस्तूंची योग्य प्रकारे काळजी घेतो.					
७.	मी, घरातल्या आणि शाळेतल्या वस्तू योग्य प्रकारे वापरतो.					
८.	मी माझी घरातली सर्व कामे करतो.					
९.	मी वर्गाचे आणि शाळेचे सर्व नियम पाळतो.					
१०.	मी आरोग्याच्या चांगल्या सवयींचे पालन करतो.					
११.	मी सत्यवादी होण्याचा प्रयत्न करतो.					
१२.	मी सर्वांना आदर देतो.					
१३.	इतरांच्या भावना समजून घेण्याचा मी प्रयत्न करतो.					
१४.	गटामधे मी इतरांच्या बरोबर चांगले काम करतो.					
१५.	जेव्हा दुसरे अडचणीत असतात तेव्हा मी त्यांना मदत करण्याचा प्रयत्न करतो.					
१६.	मी माझ्या मैत्रीला महत्त्व देतो.					
१७.	मी इतरांशी भांडणे टाळायचा प्रयत्न करतो.					
१८.	मी पाणी वाया घालविणे टाळतो.					

रिकाम्या वेळेत करायचे उपक्रम

कचऱ्याचा गुणाकार करा

जर एका मोठ्या भारतीय शहरामध्ये प्रत्येक घरातून निर्माण होणारा घरगुती कचरा सरासरी २ किलो ग्रॅम आहे तर एका वर्षात एका घरातून किती किलो ग्रॅम कचरा निर्माण होईल ?

आणि जर त्या शहरात ८००,००० घरे असतील तर एका वर्षात किती किलो ग्रॅम कचरा निर्माण होईल ?

या दुसऱ्या प्रश्नाच्या उत्तरावरून तुम्हांला कल्पना येईल की दर वर्षी पुणे शहरातील घरांमधून किती प्रमाणात कचरा निर्माण होत असेल.

२ X ? X ८००००० =

रिकाम्या वेळेत करायचे उपक्रम

किती पाणी ?

जर भारतातील एका मोठ्या शहरामध्ये वापरल्या जाणाऱ्या पाण्याचे एका घराचे सरासरी प्रमाण ४०० लिटर असेल, आणि एका बादलीत २० लिटर पाणी बसत असेल, तर एक घर* एका दिवसात किती बादल्या पाणी वापरत असेल ? आणि जर त्या शहरात १,४००,००० घरे असतील तर एका वर्षात किती पाण्याची गरज पडेल ?

दुसऱ्या प्रश्नाच्या उत्तरावरुन तुम्हांला अहमदाबाद शहरात वापरल्या जाणाऱ्या पाण्याचे प्रमाण लक्षात येईल.

$(४००/?) \times ? \times ? =$



प्रत्येक व्यक्तीला किमान काही प्रमाणात पाण्याची गरज असते. भारतात प्रति व्यक्ती रोजची पाण्याची गरज अंदाजे खालीलप्रमाणे आहे :

पिण्यासाठी	:	३ लिटर
स्वयंपाक	:	५ लिटर
स्नान	:	१५ लिटर
भांडी घासणे	:	७ लिटर
स्वच्छतागृह	:	१० लिटर

वरील आकड्यांवरून (यात कपडे धुणे, पाळीव प्राण्यांना लागणारे खाण्यापिण्यासाठीचे पाणी समाविष्ट नाही), २५० घरे असलेल्या प्रत्येक घरात सरासरी ५ व्यक्ती असलेल्या एका खेड्याची रोजची पाण्याची आवश्यकता किती असेल ?

$(३ + ? + ? + ? + ?) \times (? \times ?) =$

* 'घर' म्हणजे एका घरात राहणारे कुटुंब असा येथे अर्थ आहे. कोणत्याही प्रकारचे घर. मोठ्या कुटुंबाचे सदस्य अनेक घरात राहू शकतात.

रिकाम्या वेळेत करायचे उपक्रम

पत्र पूर्ण करा

खाली दिलेले शब्द वापरून पत्र पूर्ण करा.

पक्षी निरीक्षणाचा, कपाट, प्रेम, प्रशस्त, वाट, कामात गुंतलेली, लेखिका, आवडतील, नव्या घरात, पत्राची, कथा, बघायला, शेजारी

प्रिय शीतल

तू कशी आहेस ? मी ठीक आहे. मी तुला पत्र लिहिले नाही कारण मी फारच ..... होते.

आम्ही ..... रहायला आलो. आमचे नवीन घर खूपच ..... आहे.

माझ्या खोलीत माझं स्वतंत्र ..... आहे. माझ्या भावाचा मोहन नावाचा मित्र ..... राहतो.

त्याचे प्राण्यांवर फारच ..... आहे. त्याला ..... छंद आहे.

मला मोठेपणी ..... व्हायचे आहे. मी काही ..... लिहिल्या आहेत. त्या तुला वाचायला

..... का ? तू माझे नवे घर ..... कधी येणार ? मी तुझी ..... पाहात आहे.

केव्हा येतेस ते नक्की कळव.

तुझ्या ..... आतुरतेने वाट पाहते आहे.

तुझी प्रिय मैत्रीण,

मीना

रिकाम्या वेळेत करायचे उपक्रम

नक्षीदार आकृती रंगवा

शिक्षक नोंदी

मूल्यवर्धन
शांतिलाल मुथ्था फाउंडेशन

उद्देश :

''शालेय विद्यार्थी भविष्यात लोकशाहीचे जबाबदार, संवेदनशील आणि कर्तबगार नागरिक बनावेत म्हणून, संविधानातील मूल्ये व त्यासंबंधित कौशल्य विकसित करण्यासाठी त्यांना नियोजित अशा संधी सातत्याने देणे.''

स्वरूप आणि वैशिष्टये :

- राज्य घटनेतील मूल्ये शालेय शिक्षणात इयत्ता पहिलीपासून वयोगटानुसार रुजविण्याचा प्रयत्न
- ज्ञानरचनावादावर आधारित बालस्नेही, आनंददायी, विद्यार्थी केंद्रित शिक्षण पद्धतीचा वापर
- राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५, शिक्षण हक्क कायदा २००९ आणि प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २०१२ यावर आधारित
- मूल्ये 'शिकविली' जात नाहीत, तर ती 'नियोजित उपक्रमांतून आनंददायी पद्धतीने रुजविली' जातात
- शालेय अभ्यासक्रमाशी निगडीत विद्यार्थ्यांची सर्वांगीण प्रगती साधणारा कार्यक्रम
- मूल्यशिक्षणासाठी शाळेमध्ये सध्या होणाऱ्या प्रयत्नांना पूरक कार्यक्रम
- 'समग्र शाळा दृष्टीकोन' (Whole-School Approach) अंगिकारून मूल्ये रुजविण्याचा प्रयत्न केला जातो.
- शाळांच्या गरजा, प्राधान्यक्रम, उपलब्ध असणारी साधन सामग्री यानुसार आवश्यक वाटतील असे बदल करून राबवता येणारा लवचिक कार्यक्रम

मूल्यवर्धन

शांतिलाल मुथ्था फाउंडेशन

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण)
७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे – ४११ ०३०